# भवाळकरांच्या ध्रुपद गायकीचे रसिकांवर गारूड

## आर्ट सर्कलतर्फे आयोजन : शमिका-स्वरांगीचे जुगलगायनही रंगले, जोरी वाद्याचीही साथ

**कला, संगीत महोत्सव...**

सकाळ वृत्तसेवा

रत्नागिरी, ता. २७ : आर्ट सर्कलच्या अकराव्या संगीत महोत्सवात ध्रुपद गायकीचे महान गायक पंडित उदय भवाळकर यांच्या गायनाने बहर आला. आजकालच्या गतिमान जगतात ख्याल गायकी पसंत करणारी युवा पिढी ध्रुपद गायकी कमी ऐकते. पण ख्याल गायकी ही मूलतः ध्रुपद गायकीतूनच जन्माला आली आहे, हे पं. भवाळकर यांनी गायनातून सिद्ध करून दाखवले. ऐतिहासिक थिबा राजवाड्याच्या प्रांगणात काल (ता. २६) सायंकाळी महोत्सवाचे शानदार उद्‍घाटन झाले. महोत्सवाचा पहिला दिवस (कै.) शरद पटवर्धन कुटुंबिय, नंदकुमार पटवर्धन आणि आतमेश बेलवलकर यांनी प्रायोजित केला.

सुरवातीला गायिका शमिका भिडे आणि स्वरांगी मराठे यांचे जुगलगायन रंगले. गायिका अश्विनी भिडे-देशपांडे यांच्या या दोन्ही शिष्यांनी अप्रतिम गायन करत चुणूक दाखवली. त्यानंतर पंडित भवाळकर यांनी गायनाची सुरुवात राग शंकराने केली. स्वभावतः गोड आणि नखरेल असा हा राग



रत्नागिरी : आर्ट सर्कल आयोजित कला संगीत महोत्सवात गायन करताना पं. उदय भवाळकर. वाद्यसाथ करताना सुखविंदरसिंग नामधारी व संगीत मिश्रा. (छायाचित्र : कांचन मालगुंडकर, रत्नागिरी)

ध्रुपद गायकीमुळे प्रकाश खुलला. गळ्याच्या सर्वांत जवळ असलेले वाद्य सारंगी साथीला असल्यामुळे आणखी मजा आली. साथीला क्वचितच ऐकायला मिळणाऱ्या जोरी वाद्यामुळे गायनात गोडी, लडिवाळपणाबरोबरच गतिमानता आली. नंतर पंडितजींनी राग बागेश्री पेश केला. बागेश्री पेशकारीत वैभवशाली सारंगी परंपरेचे पाईक संगीत मिश्रांनी गोडवा भरला. तेवढेच सुरेख जोरीवादन पं. सुखविंदरसिंग नामधारी यांनी केले.

> जोरी व सारंगीसाथीमुळे भवाळकर यांचे ध्रुपद गायन म्हणजे जणू पर्वणीच आविष्कार ठरला. या कार्यक्रमाने आमच्यासारखे अनेक रसिक मंत्रमुग्ध झाले.
> - राहुल ओक, चिपळूण

**आज डॉ. प्रभा अत्रे यांचे गायन**

उद्या (ता. २८) सायंकाळी तबला सम्राट वादक पं. पूर्वायन चॅटर्जी यांचे तबलावादन होणार आहे. त्यांना साथ करणार आहेत सत्यजित तळवलकर. प्रख्यात गायिका डॉ. प्रभा अत्रे यांच्या स्वर्गीय स्वरांनी महोत्सवाची सांगता होणार आहे.

**कलादालनात धम्माल**

थिबा राजवाड्यात छायाचित्रकार गणेश खवळे, वन अधिकारी श्री. पाटील आणि नगराध्यक्ष राहुल पंडित यांच्या हस्ते कलादालनाचे उद्‍घाटन झाले. शालेय विद्यार्थ्यांची चित्रे, बापट बंधूंचे जंगलातील छायाचित्रांचे प्रदर्शन, स्वानंद जोशी यांची ओरिगामीची मॉडेल्स, सेन्ट आर्टने रेखाटलेली १७५ पक्ष्यांची छायाचित्रे मांडली आहेत. टेंटूची धमाल कलादालनात प्रथमच आहे. अंगारा खवळे हिच्या हस्तकलेतून साकारलेल्या वस्तू, पार्थ प्रदर्शन, हेरंब केळकर आकर्षक ५५ वाद्येही पाहता येतील. प्रदर्शन उद्या सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांसाठी निःशुल्क खुले आहे.